**शपथेवर उलटतपास श्री जयपाल पाटील अधीवक्तरा गैर अर्जदारातर्फे :–**

०७. हे म्हणने खरे आहे की माझी नियूक्ती ही दिनांक १८.०५.१९७९ रोजीच्या आदेशा नुसार झाली होती. हे म्हणने खरे आहे की त्यानुसार मी दिनांक २१.०५.१९७९ रोजी एनव्हार्नमेन्ट इंजीनिअरींग विभागात रुजू झालो. हे म्हणने खरे आहे की सदर आदेशानुसार मला ६ महीन्याकरीता नियुक्ती दिली होती व सदर नियुक्ती ही तातपूर्त्या स्वरुपावर असून व कामाच्या उपलब्धतेनुसार देण्यात आली होती. आता मला प्रकरणामध्ये दाखल दिनांक १८.५.१९७९ रोजीचा माझे नियुक्तीचा आदेश दाखवीला तो तोच आहे त्यास निशाणी **सी–१५** देण्यात येते. हे म्हणने खरे आहे की त्यानंतर मला १२.०२.१९८६ रोजीच्या आदेशानुसार दिनांक २१.०५.१९८४ पासून सी. आर. टी. ई. वर घेण्यात आले. सन १९७९ मध्ये मला पम्प ऑपरेटर या पदावर कामगीरी देण्यात आली होती. हे म्हणने खरे आहे की त्यानंतर मला दिनांक १७.१०.१९९४ रोजी ईलेक्ट्रेशीयन या पदावर पदोन्नती देण्यात येवून मला बल्लारशाह येथे वाटर सप्लाय स्कीम येथे पाठवीण्यात आले. हे म्हणने खरे आहे की मला सी.आर.टी.ई. वरुन परमनन्ट इस्टॅब्लीशमध्ये १७.१०.२००४ रोजी घेण्यात आले. हे म्हणने खरे आहे की त्यानंतर मला दिनांक ३१.१०.२०१२ रोजी सेवा नियुमानुसार माझे नियत वयोमानानुसार मला सेवानिवृत्त करण्यात आले. हे म्हणने खरे आहे की माझे सेवेला एम.सी.एस. आर. नियम लागू आहे. हे म्हणने खरे नाही की पम्प चालकाची वेतन श्रेणी ही रुपये २५०–४३५ ऐवढी होती. हे म्हणने खरे नाही की नि. सी–१५ वरील आदेशामध्ये माझी वेतन श्रेणी चुकीची नमूद केली आहे. हे म्हणने खरे नाही की माझे सेवा निवृत्तीच्या वेळेस माझा शेवटचा पगार हा रुपये १७४९०/– एवढा होता. हे म्हणने खरे नाही की मला चुकीच्या वेतन श्रेणीनुसार जास्तीचे वेतन देण्यात आले होते. हे म्हणने खरे नाही की मी डिपार्टमेन्टला दिनांक २४.०६.१९९९ तसेच १२.०९.२००९ रोजी वचन पत्र लिहून दिले होते. आता मला प्रकरणामध्ये दाखल दिनांक २४.०६.१९९९ व १२.०९.२००९ रोजीचे वचन पत्र दाखवीले त्यावर माझी सही आहे. हे म्हणने खरे नाही की यामध्ये लिहीलेला मजकूर खरा व बरोबर आहे. माझी त्यावर फक्त सही आहे. सदर वचन पत्र हे मी सही करताना वाचले नव्हते. असे कोणतेच कागदपत्रे नाही की मी त्यावर न वाचता सही केली आहे व न वाचता कागद पत्रांवर सही करतो. मला इंग्रजी मराठी वाचता येते परंतू समजत नाही. मी सन १९७१ ला मॅटीक पास झालो आहे. व त्यानंतर मी आय.टी.आय. चे शिक्षण घेतले.

माझी मातृभाषा मराठी आहे. माझे शिक्षण मराठी मीडीयममध्ये झाले. हे म्हणने खरे आहे की मला मराठी चांगल्या प्रकारे वाचता येते व समजते. हे म्हणने खरे आहे की वरील वचन पत्र इंग्रजी मध्ये व मराठीमध्ये लिहीलेले आहे व मला मराठी चांगल्या प्रकारे समजते. हे म्हणने खरे आहे की सदर वचन पत्रावर असे नमूद केलेले आहे की “मी असे वचन देतो की चुकीच्या वेतन निश्चितीमुळे किंवा पुढे वेतन निश्चितीमध्ये वीसंगती आढळून आल्यामुळे मला अती प्रदान झाल्याचे निदर्शनास आल्यास ते भवीष्यात मला प्रदान करण्यात येणा–या रकमेतून समायोजीत करुन किंवा ईतर प्रकारे मी शासनास परत करेल”. अर्जदार स्वत: सांगतो की अशी कागदपत्रे मला मीळाली नाही. अर्जदार सांगतो की अशा प्रकारचे कागदपत्रे मला आलेले नाही व मी त्यावर सही केलेली नाही. हे म्हणने खरे आहे की नि. यु–३ वर माझी सही आहे. आता मला प्रकरणामध्ये गैरअर्जदार यानी क्रमांक ५,६ व ७ वर दाखल केलेले कागदपत्रे दाखवीली व त्या कागदपत्रांवर माझी सही आहे. सदर सहीस अनुक्रमे नि. **सी. १६ ते सी–१८** देण्यात येते. आता मला सदर प्रकरणामध्ये मी दिलेला नि. यु–७ वरील दिनांक १६.४.२०१५ रोजीचा अर्ज दाखवीला त्यावर माझी सही आहे व तो मी मराठीमध्ये स्वत: लिहीलेला आहे. हे म्हणने खरे आहे की ऑक्टोबर २०१२ मध्ये मी सेवानिवृत्त झाल्यानंतर दिनांक १५.०४.२०१५ पर्यन्त कोणत्याही मागणीकरीता गैरअर्जदाराला अर्ज केलेला नाही. हे म्हणने खरे नाही की दिनांक १७.०८.१९९० च्या शासन निर्णया नुसार पम्प चालकाची वेतन श्रेणी ही २५०–४३५ एवढी आहे. हे म्हणने खरे आहे की मला दिनांक २०.११.२००६ पासून आश्वासीत प्रगती याजनेचा लाभ मीळालेला आहे. हे मला आठवत नाही की त्याबाबतचा वीकल्प प्रपत्र–२ मी भरुन दिला होता. हे म्हणने खरे नाही की त्यानुसार माझी वेतन निश्चिती करण्यात आली होती. हे म्हणने खरे आहे की मी दिलेल्या विकल्प प्रपत्र–२ नुसार कार्यालयीन आदेश करुन मला वरील आश्वासीत प्रगती याजनेचा लाभ देण्यात आला होता. हे मला आठवत नाही की मी विभागाला मला आश्वासीत प्रगती याजनेचा लाभ मीळण्याकरीता विकल्प प्रपत्र –२ भरुन दिला होता. हे म्हणने खरे नाही की मी विभागीला हमीपत्र सुध्दा भरुन दिले होते. माझी उपदानाची रक्कम रुपये १,००,०००/– ही गैरअर्जदारानी वेतन निश्चितीच्या कारणास्तव कपात केली होती. हे म्हणने खरे नाही की मला विभागाने २४.०७.२०१४ च्या पत्रानुसार माझे वेतनाचे पुर्ननिश्चिती करुन आपणास कळवीले होते. हे म्हणने खरे आहे की त्यानुसार पम्प चालकाची वेतन निश्चिती २५०–४३५ करुन मला फरकाची रक्कम देण्यात आली होती. हे म्हणने खरे नाही की एम.सी.एस.

आर मधील कलम १३२ (३) (बी) व १३४ नुसार व शासन निर्णय दिनांक ३०.०७.२००७ नुसार कर्मचा–यास अतीरक्त प्रदान केलेली रक्कम कपात, वसूल व समायोजीत करण्याचा अधिकार विभाग प्रमुखाला आहे. हे म्हणने खरे नाही की पम्प चालकाच्या वेतन निश्चिती पेक्षा माझी वेतन निश्चिती जास्तीची केली आहे याबाबत मला माहीती होती. हे म्हणने खरे नाही की माझी वेतन निश्चिती केल्यानुसार विभागाने मला योग्य उपदानाची रक्कम दिली. हे म्हणने खरे नाही की माझे वेतन निश्चतीनुसार मला २,७२,०९५/– एवढी उपदानाची रक्कम देय होती. हे म्हणने खरे आहे की वेतन निश्चितीनुसार अती प्रदान झालेल्या रकमेची समायोजन करुन उर्वरीत रक्कम मला उपदानाच्या शिर्षकाखाली देण्यात आले. हे म्हणने खरे नाही की मी उपदानाची रक्कम रुपये ५,६४,५०९/– ची चुकीची मागणी केलेली असून बेकायदेशीर आहे. हे म्हणने खरे नाही की मला उर्वरीत रक्कम रुपये ३,९७,९७६/– गैरअर्जदार याना देणे लागत नाही. हे म्हणने खरे नाही की सदर रक्कम मीळण्याकरीता मी खोटी साक्ष देत असून खोटी तक्रार दाखल केली आहे. हे म्हणने खरे नाही की माझा शेवटचा पगागर रुपये २९,६५१/– ऐवढा होता हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणने खरे आहे की मी सदर प्रकरणामध्ये मला शेवटचा पगार रुपये २९,६५१/– ऐवढा होता हे दर्शवीणारा दस्त मी सदर प्रकरणात दाखल केला नाही. हे म्हणने खरे आहे की मी दिनांक २०.०५.१९९७ ते २९.५.१९९७ या कालावधीमध्ये बेकायदेशीर संपामध्ये सहभागी झालो होतो. हे म्हणने खरे नाही की मी या प्रकरणामध्ये मागणी केलेल्या कोणत्याही मागणीस पात्र नाही.

उलटतपास पूर्ण झाला.

फेर तपास नाही.

माझे समक्ष

स्वा/–

(श्रीमती रू.वि. मेटे)
न्यायाधीश

दि. १२.१२.२०२४. कामगार न्यायालय, चंद्रपुर.